**MOUNT CARMEL INTERNATIONAL SCHOOL, AKOLA**

**Cambridge International**

TERM END EXAM: II    Subject: Marathi    Date: 04.04.2024

Student's Name: ______________________________ Roll No. ______ Grade: 4

Marks: 35    Time Duration:90 minutes    Invigilator's Sign.

**प्रश्न १. अ. खालील अपठित पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(५)**

**(The extract is given on a separate paper)**

१.कोण ते लिहा.

अ. सर्वांच्या हातात असणारे यंत्र -

_______________________________________________

आ. विज्ञान युगात पळून गेलेले -

_______________________________________________

२. खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.

अ. मोबाईल आपल्या सोबत काय घेऊन आला?

_______________________________________________

_______________________________________________

३. काव्यपंक्ती पूर्ण करा.

अ. नव्या युगाची _______________________________________

_______________________________________ आमची पिढी

४. इंग्रजीत अर्थ लिहा.

अ. संदेश _______________

**प्रश्न १ आ. खालील पठित उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(५)**

**(The extract is given on a separate paper)**

१. आकृती पूर्ण करा.

जेजुरी गडाचा उल्लेख आढळणारे

| | |
|---|---|
| | |

२. एका वाक्यात उत्तरे लिहा.

अ. तलाव कोणी बांधला व केव्हा?

_______________________________________________

_______________________________________________

आ. जेजुरीला कोण-कोणत्या नावाने संबोधले जाते?

_______________________________________________

_______________________________________________

३. वचन बदला.

फुलबागा ____________

४. इंग्रजीत अर्थ लिहा.

तलाव ____________

**प्रश्न १ इ. खालील पठित पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(५)**

**(The extract is given on a separate paper)**

१. कोण ते लिहा.

अ. पुढे उभे राहणारे - ____________________

आ. चालता चालता आडवे येणारे - ____________________

२. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.

खिशात काय आहे?

______________________________________________

______________________________________________

३. वचन बदला.

भाकऱ्या ______________

४. समानार्थी शब्द लिहा.

हस्त = ______________

**प्रश्न २. अ. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **(२)**

१. ________________ हा विविधतापूर्ण देश आहे.

२. मी तीन________________घेतली.

**आ. कोण-कोणास म्हणाले ते लिहा.** **(१)**

"मी जेवणाच्या वेळी तुम्हाला त्रास देतो."

______________________________________________

**इ. लिंग बदला.** **(१)**

देव ____________

**ई. इंग्रजीत अर्थ लिहा.** **(२)**

१. रथ __________ २. राजधानी __________

**प्रश्न ३. अ. खालील वाक्य सुधारून लिहा.** **(२)**

१. झाले भाऊ तयार दोघेही.

_______________________________________________

२. न्याय हा नाही की मला वाटते.

_______________________________________________

**आ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

१. मुस्लिम बांधव कोणत्या ग्रंथाचे पठण करतात?

_______________________________________________

_______________________________________________

२. शिनूकडे किती भाकऱ्या होत्या?

_______________________________________________

_______________________________________________

३. खंडोबाच्या पत्नीचे नाव काय?

_______________________________________________

_______________________________________________

**इ. खालील वाक्यातील क्रियापद ओळखा व लिहा.** **(३)**

१. आई स्वयंपाक करते. _______________

२. पोपट गोड बोलतो. _______________

३. वैभवी गाणं सुरेल गाते. _______________

**ई. खालील वाक्यातील विशेषण ओळखा व लिहा.** **(२)**

१. मला गोड पेरू आवडतो. _______________

२. जाईची वेल नाजूक असते. _______________

**प्रश्न ४. खालीलपैकी कोणताही एक प्रश्न सोडवा.** **(५)**

१. निबंध लिहा - सावित्रीबाई फुले

२. निबंध लिहा - माझा आवडता सण

३. पत्र लिहा - विषय : लहान बहिणीस गायनाच्या स्पर्धेत बक्षीस मिळाल्याबद्दल तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

****************************

**Extract (Grade 4)**

**प्रश्न १. अ) अपठित पद्य**

विज्ञानाचे युगे हे आले
फोन सगळे पळून गेले.
हाती आता ज्याच्या-त्याच्या
मोबाईल हे यंत्र आले.
एस एम एस आणि
व्हाट्सअप
मोबाईल हे घेऊन आले.
क्षणाक्षणाला संदेश देई
मोबाईल हे यंत्र आले.
नव्या युगाची नव्या जगाची
ओळख ज्याने करून दिली.
त्या मोबाईलवर प्रेम करी
जुनी-नवी आमुची पिढी!

**प्रश्न १ आ) पठित उतारा**

श्रीक्षेत्र जेजुरीचा कुलस्वामी खंडेराया म्हणजे अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत. रंकांपासून रावांपर्यंत सर्वांच्या देवघरांमध्ये पूजिला जाणाऱ्या कुलस्वामी खंडेरायाच्या जेजुरीनगरीचे ऐतिहासिक महत्त्व अपरंपार आहेत. अनेक शिलालेख आणि ऐतिहासिक दस्तऐवजामध्ये जेजुरी गडाचा उल्लेख आढळतो.

जेजुरी नावाच्या डोंगरातून ओढ्याद्वारे वाहत येणाऱ्या पाण्यावर १७७० मध्ये अहिल्यादेवी होळकरांनी हा तलाव बांधला. सोबतच तलावाच्या पूर्व-उत्तर बाजूस देवपूजेसाठी फुलबाग निर्माण केली. तर दक्षिण बाजूस चिंचेच्या झाडांची बाग तयार केली. संपूर्ण दगडी बांधकाम असलेल्या तलावाला पाच ठिकाणांवरून खाली उतरण्यासाठी बांधीव पायऱ्या आहेत तर दोन ठिकाणी मोटेद्वारे पाणी उपसण्याची थारोळी आहेत.

जेजुरीला "देवा तुझी सोन्याची जेजुरी" किंवा "देवाची जेजुरी" असे संबोधले जाते.

**प्रश्न १. इ) पठित पद्य**

समोर समोर चालता चालता
शेवटी संपून जाईल रस्ता,
आकाश राहील उभे पुढ्यात,
चांदोबाला लागेल हात.

असे काही मनात धरून
चालत सुटतो रस्त्यावरून
गळ्यात गलोल, हातात छडी,
खिशात शेंगदाण्याची पुडी.

चालता चालता काय होते
रेल्वे फाटक आडवे येते.
गाडीला मग 'टाटा' करतो
समोर समोर चालत राहतो.

चालता चालता काय होते,
एक छोटे तळे लागते.
पाय बुडवून, भाकऱ्या खाऊन
दाणे खात चालतो फिरून.

****************************